जिल्हा व सत्र न्यायालय, सोलापूर.
रंगभवन चौक, सोलापूर ४१३ ००३
ई—मेल आयडी — mahshodc@mhstate.nic.in
दुरध्वनी क्रमांक ०२१७—२६२७०७७

# जाहीर प्रसिध्दीकरण

याव्दारे जाहीर प्रसिध्दीकरण करण्यात येते की, माननीय उच्च न्यायालय, मुंबई यांचे आदेशानुसार, जिल्हा व सत्र न्यायालय, सोलापूर, अतिरिक्त जिल्हा व सत्र न्यायालय, बार्शी, दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर, करमाळा तसेच दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर, माढा या न्यायालयीन आस्थापनांकरिता लिपीक—टंकलेखक, शिपाई व सफाईगार अशा कांही पदांची सेवा—बाहय यंत्रणेव्दारे दोन वर्षाच्या करारान्वये, उपलब्ध करुन देण्यासाठी, नोंदणीकृत कंत्राटदारांकडून ई—निविदा मागविण्यात येणार आहेत.

सविस्तर ई—निविदा सुचना व त्यासंबंधीच्या अटी व शर्ती महाराष्ट्र शासनाच्या ई—निविदा पोर्टलवर—(http://www.mahatenders.gov.in) या संकेतस्थळावर हे जाहीर प्रसिध्दीकरण केल्यानंतर ७ दिवसांनी म्हणजेच दिनांक २२/०९/२०२५ रोजीपासून उपलब्ध असेल.

सबब, इच्छुक नोंदणीकृत कंत्राटदार यांनी वर नमुद करण्यात आलेल्या संगणकीय संकेतस्थळी उपलब्ध होणाऱ्या ई—निविदा सुचनेनुसार ऑनलाईन निविदा सादर करावयाच्या आहेत.

ऑनलाईन प्राप्त ई—निविदांची तपासणी आणि छाननी संपूर्णपणे (http://mahatenders.gov.in) या संकेतस्थळावर अनुज्ञेय नियमांस अनुसरुन होईल याची निविदाकारांनी नोंद घ्यावी.

ऑनलाईन ई—निविदा सादर करण्यास काही अडचण आल्यास, मदतीकरिता २४X७ टोल फ्री क्रमांक १८००—३०७०—२२३२ वर संपर्क साधण्यात यावा.

हे जाहीर प्रसिध्दीकरण आमच्या सही व शिक्यानिशी प्रसिध्द करण्यात येत आहे.

ता. : १५/०९/२०२५

( मनोज एस. शर्मा )
प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश,
सोलापूर.

ठिकाण — सोलापूर
ता. १५/०९/२०२५